संदर्भ क्र.:एमएमसीसी/ महाराष्ट्र स्टेट स्कॉलरशिप / २०२४-२०२५/ 182 ०५/०९/२०२४

**नोटीस**

**राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना सन २०२४-२०२५ करीता FRESH तसेच RENEWAL चे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरणे बाबत..**

वरिष्ठ महाविद्यालयातील **(BBA, BBA (IB), BCA विद्यार्थ्यांनं व्यतिरिक्त) सर्व खुल्या प्रवर्गातील, एसईबीसी, ईडब्लूएस** पात्र विदयार्थी तसेच **उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजने अंतर्गत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थींना (BBA, BBA (IB), BCA विद्यार्थीनी व्यतिरिक्त)** उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण -२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४ दि. ०७.१०.२०१७ च्या शासन निर्णयमध्ये नमूद असलेल्या अभ्यासक्रमांना प्रवेशित असलेल्या विद्यार्थींना कळविण्यात येते कि, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना **सन २०२४-२०२५** करीता चालू झालेली असून, सदर अर्ज FRESH तसेच RENEWAL चे अर्ज https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. सदर शिष्यवृत्ती हि कुटूंबातील फक्त दोन अपत्या पुरतीच मर्यादित आहे. तसेच आर्थिक वर्ष २०२३-२०२४ करीता पालकांचे उत्पन्न हे **८ लाख किंवा त्यापेक्षा कमी** असून, त्याचा तहसीलदार कडून प्राप्त झालेला दाखल असणे आवश्यक आहे. सर्व पात्र नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी New Applicant Registration करून स्वतःचे UserID आणि Password तयार करावे व ज्या विद्यार्थांनी या पूर्वी वरील नमूद वेबसाईटवर अर्ज भरले आहेत अश्यानी त्यांचे या पूर्वीच्या userid नेच अर्ज भरावे. नवीन तयार केला UserID आणि Password हा कायमस्वरूपी लागणार असल्या कारणाने त्याची योग्य अशी नोंद करून ठेवावी. सदर अर्ज भरतेवेळी नमूद केलेले सर्व ओरिजनल कागदपत्रे २५६ kb च्या आत jpeg स्वरूपात अपलोड करावे.
**चालू शैक्षणिक वर्षात माहिती भरत असताना वरिष्ठ महाविद्यालयातील विध्यार्थ्यानी Marathwada Mitra Mandal's College of Commerce (३४८९) असे महाविद्यालयाचे नाव निवडावे. RENEWAL करीत असताना Online दिलेल्या सूचना काटेकोरपणे वाचून त्याप्रमाणे Profile Update करावा, उदाहरणार्थ चालू शैक्षणिक तसेच इतर आवश्यक ते बदल करूनच अर्ज वरील शिष्यवृत्तीस लागू करावा.**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | १० वी/१२ वी/ ग्रॅज्युएशन उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| २. | मागील शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ ची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स ) ऑनलाईन निकाल असल्यास महाविद्यालयाने साक्षांकित केलेली प्रत |
| ३. | १० वी /१२ वी /ग्रॅज्युएशन पदवी सोडल्याचा दाखला (झेरॉक्स) |
| ४. | विद्यार्थ्यांच्या नावाचे डोमेसाइल सर्टिफिकेट (झेरॉक्स) |
| ५. | कौटूंबिक उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२०२४ चा तहसीलदार चा दाखला ( उत्पन्न मर्यादा योजनेच्या नियमांनुसार)(Original) |
| ६. | आधारकार्ड (झेरॉक्स) |
| ७. | राशनकार्ड (झेरॉक्स) |
| ८. | विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकचे पहिले पान (Original) |
| ९. | चालू शैक्षणिक वर्षाची फी भरल्याची पावती (झेरॉक्स) |
| १०. | चालू वर्षा करीता पालकांचे अपत्यां बाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र |

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतःचा मोबाइल नंबर व बचत खाते हे त्वरित आधारकार्डशी संलग्नित करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्यांची शिष्यवृत्ती जमा न झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील. तसेच ऐका वेळेला एकच शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्याला घेता येईल व जे विद्यार्थी वसतिगृहात अथवा भाडेतत्वावर राहत असतील व आर्थिक वर्ष २०२३-२०२४ करीता ज्यांच्या पालकांचे उत्पन्न हे १ लाख किंवा त्यापेक्षा कमी असेल असे विद्यार्थी वरील शिष्यवृत्ती सोबत डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह योजनेकरिता ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतात (माहितीसाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह योजने संदर्भातील नोटीस वाचावी) . याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

योजेनेच्या सविस्तर माहितीसाठी तसेच संबधीत अभ्यासक्रम योजनेत समाविष्ठ आहे की नाही ते तपासण्यासाठी शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि ०७.१०.२०१७ तसेच शासन निर्णय क्र. टीईएम-२०१८/ प्र.क्र.३५/तांशि-४, दि ३१.०३.२०१८ पहावे.

अचूक अर्ज भरून झाल्यावर वरील कागदपत्रांसोबत (नमूद केलेल्या क्रमानुसार) आवश्यक त्या सर्व कागदपत्रासोबत महाविद्यालयाच्या स्कॉलरशिप विभागात सोमवार ते शनिवार **सकाळी ११.०० ते दुपारी १.००** या वेळेत जमा करावे.

MAHADBT पोर्टल वर ऑनलाईन अचूक अर्ज भरलेल्या अर्जाची प्रत व इतर वरील वरिल नमूद केल्या क्रमवारीनुसार कागदपत्रे सादर करण्याची **अंतिम तारीख ही दिनांक १५/०३/२०२५** असून, त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांवर महाविद्यालयाकडून कुठल्याही प्रकारची कार्यवाही होणार नाही याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी.

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

**श्रीमती. हर्षला वाडकर**
प्रशासन अधिकारी

**डॉ. देविदास गोल्हार**
प्राचार्य

प्रत: १. सर्व शाखा प्रमुखांना विद्यार्थ्यांना सूचित करण्यासाठी
सोबत: RENEWAL कारण्याबाबची कार्यपद्धती जोडली आहे.